महाराष्ट्र विधानसभा

दिवसाच्या कामकाजाचा क्रम
सोमवार, दिनांक २५ जुलै, २०१६
(सकाळी ११.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे.

दोन : संसदीय कार्य मंत्री यांचा प्रस्ताव :-

महाराष्ट्र विधानसभेच्या सदस्यांची "**नितीमूल्य समिती**" गठीत करणे.

तीन : औचित्याचे मुद्दे.

चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :

(१) **सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ, विजय वडेट्टीवार, अमिन पटेल, अस्लम शेख, प्रा.वीरेंद्र जगताप मो.आरिफ नसीम खान, ॲड राहूल कुल, वि.स.स पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे अन्न आणि औषध प्रशासन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"बुलढाणा जिल्हयात अशुध्द पाणी विक्रीचा व्यवसाय दिवसेंदिवस वाढत असतानाही त्याकडे अन्न व औषध प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याची बाब माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, अल्प आर्थिक गुंतवणूक करुन अनेकांनी पाणी प्रकल्प उभारले असून यास भारतीय मानक ब्युरो (बीआयएस) ची तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाची सुद्धा नसलेली परवानगी, विक्रीसाठी पॅकिंग केलेल्या जारवर कोणताही उल्लेख, लेबल लावण्यात येत नसणे, प्लँटमध्ये पाणी तपासणीसाठी नसलेले प्रयोगशाळा, केवळ टीडीएल मीटर लावलेले असणे, पॅकेज ड्रिकींगसाठी वापरण्यात येणारे पारदर्शक जार फुड ग्रेड आहेत की नाही याचा कुठेही उल्लेख नसणे, वॉटर पॅकेजिंगची प्रक्रिया भारतीय मानक ब्युरोच्या (बीआयएस) निकषांप्रमाणे नसून अनेक ठिकाणी स्वच्छता नसणे, मिनरल वॉटरच्या नावाखाली दररोज लाखो रुपयांची पाणीविक्री करुन नागरिकांच्या आरोग्याशी सुरू असलेला खेळ व त्याकडे शासन करत असलेले दुर्लक्ष, परिणामी येथील जनमानसात निर्माण झालेला असंतोष, त्यामुळे येथील पाणी उद्योगांची चौकशी करुन त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री. अनिल गोटे, वि.स.स पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे परिवहन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील वाहन निवेदित परवान्यामध्ये १२+१ तसेच ७+१ एवढया क्षमतेच्या महिंद्रा कंपनीच्या तसेच मारुती मोटर्सच्या व्हॅनला ७+१ एवढी वाहतुक करण्याची क्षमता असताना सुध्दा

गृह व परिवहन खात्याने ६+१ व ४+१ एवढ्या क्षमतेची प्रवासी वाहतुक करणाऱ्या वाहनांना परवानगी दिलेली, याउलट खाजगी वाहतुक करणाऱ्या वाहनांना मात्र १२+१ व ७+१ ची परवानगी देणे, वाहतुक नियमातील तफावतीमुळे राज्यभरातील प्रवासी वाहतुक करणाऱ्या तरुणांचे होत असलेले आर्थिक नुकसान, खाजगी व प्रवासी वाहतुक यांच्या नियमातील तफावतीचा पोलीस व परिवहन कर्मचाऱ्यांकडून (आर.टी.ओ) होत असलेला दुरूपयोग, सबब पोलीस व वाहतूक विभागात मोठया प्रमाणावर सुरू असलेला भ्रष्टाचार, यामुळे ग्रामीण भागातील प्रवासी वाहतुक करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलांमध्ये निर्माण झालेला असंतोष, शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

(३) **श्री.भास्कर जाधव, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे पर्यावरण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"लोटे ता.खेड, जि. रत्नागिरी येथील औदयोगिक वसाहतीमध्ये प्रदूषणाची अत्यंत गंभीर बनलेली समस्या, पावसाळयाच्या दिवसात कारखानदारांकडून अत्यंत घातक, दूषित रासायनिक सांडपाणी उघडयावर सोडण्यात येत असल्यामुळे हे सांडपाणी नदीपात्रात मिसळून दाभोळ खाडी व जगबुडी नदीपात्रातील मासे मोठया प्रमाणात मृत झाल्याच्या घटना माहे जून-जुलै २०१६ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस येणे, सदर रासायनिक पाणी पिऊन जनावरे दगावल्याची घडलेली घटना, सतत मृत माशांचा खच पडत असल्याने दुर्गंधी पसरून खाडीपट्टयातील लोकवस्तीमध्ये आरोग्याचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, तसेच मच्छीमार समाजाचे संपुष्टात आलेले उदरनिर्वाहाचे साधन, दि. २७ जून २०१६ रोजी घरडा केमिकल प्रा. लि. या कंपनीत झालेला स्फोट, त्यामुळे संपूर्ण औदयोगिक वसाहतीसह परिसरातील गावांमध्ये धुराचा लोट पसरून नागरिकांना झालेला त्रास, तसेच दि. ६ जुलै २०१६ रोजी एस.आर.ग्रुप इंडियन ऑक्सिलेट या कंपनीमध्ये मोठया प्रमाणात वायू गळती होवून परिसरातील रहिवाशांना डोळयांची जळजळ व श्वसनाचा त्रास झाल्याने वैदयकीय उपचारांसाठी करावी लागलेली धावपळ, एकूणच आग, स्फोट, रासायनिक सांडपाणी उघडयावर सोडण्यात येणे अशा घटनांमध्ये वाढ होवूनही शासनाच्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडून सोयीस्कररित्या दुर्लक्ष करण्यात येणे, या प्रकारामुळे रहिवाशी व नागरिकांच्या जिविताचा निर्माण झालेला प्रश्न, त्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, ही बाब विचारात घेता प्रदूषण व दुर्घटनांना जबाबदार असलेल्या दोषींवर तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

पाच : सन २०१६-२०१७ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (पहिला दिवस).

(१) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग.

(२) नगरविकास विभाग.

(३) गृहनिर्माण विभाग.

(४) सार्वजनिक आरोग्य विभाग.

(५) पर्यावरण विभाग

(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)

सहा : शासकीय विधेयके :

(अ) पुर:स्थापनार्थ :-

सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र विद्युत शुल्क विधेयक, २०१६.

(ब) विचार पुढे सुरु, खंडश: विचार व संमत करणे :-

सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१६.

(क) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-

(१) (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री अमीन पटेल, राधाकृष्ण विखे पाटील, राहुल मोटे, हसन मुश्रीफ, विजय वडेट्टीवार, सुरेश लाड, अस्लम शेख, अबू आझमी, हर्षवर्धन सपकाळ, जयंत पाटील, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, बाळासाहेब पाटील, डॉ.सतीश पाटील, श्री.वैभव पिचड, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री भास्कर जाधव, दिपक चव्हाण, संजय कदम, राणाजगजितसिंह पाटील, डॉ.जितेंद्र आव्हाड, सर्वश्री हनुमंत डोळस, जयदत्त क्षीरसागर, राहुल जगताप, शशिकांत शिंदे, राजेश टोपे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ — महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा) अध्यादेश, २०१६ नापसंत करते."

(ख) **सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१६.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अजित पवार, दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, भास्कर जाधव, हनुमंत डोळस, पांडुरंग बरोरा, डॉ.जितेंद्र आव्हाड, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री हसन मुश्रीफ, वैभव पिचड, राहुल जगताप, राणाजगजितसिंह पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(२) (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री पृथ्वीराज चव्हाण, अमीन पटेल, राधाकृष्ण विखे पाटील, राहुल मोटे, हसन मुश्रीफ, विजय वडेट्टीवार, सुरेश लाड, अस्लम शेख, अबू आझमी, हर्षवर्धन सपकाळ, जयंत पाटील, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, बाळासाहेब पाटील, डॉ.सतीश पाटील, श्री.वैभव पिचड, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री भास्कर जाधव, दिपक चव्हाण, संजय कदम, राणाजगजितसिंह पाटील, डॉ.जितेंद्र आव्हाड, सर्वश्री हनुमंत डोळस, जयदत्त क्षीरसागर, राहुल जगताप, शशिकांत शिंदे, संदीप नाईक, राजेश टोपे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १० — महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०१६ नापसंत करते."

(ख) **सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१६.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सुभाष उर्फ पंडितशेट पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(३) (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री राहुल मोटे, हसन मुश्रीफ, विजय वडेट्टीवार, सुरेश लाड, अस्लम शेख, अमीन पटेल, जयंत पाटील, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, बाळासाहेब पाटील, डॉ.सतीश पाटील, श्री.वैभव पिचड, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री भास्कर जाधव, दिपक चव्हाण, संजय कदम, राणाजगजितसिंह पाटील, डॉ.जीतेंद्र आव्हाड, हनुमंत डोळस, जयदत्त क्षीरसागर, राहुल जगताप, शशिकांत शिंदे, राजेश टोपे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १५ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०१६ नापसंत करते."

(ख) **सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१६.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २४ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : २२ जुलै, २०१६

डॉ. अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.